दाखल दिनांक : २५.०८.२०१५

नोंदणी दिनांक : २६.०८.२०१५

निकाल दिनांक: ०४.०८.२०२६

कालावधी : वर्षे, महिना, दिवस
१० ११ १०

**MHSO1100031122015**

| | |
|---|---|
| | **माळशिरस येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**ता. माळशिरस, जि. सोलापूर**<br>(**पिठासीन अधिकारी – यु. बी. पेठे**)<br>**न्यायनिर्णय**<br>**(घोषित दिनांक ०४/०८/२०२६)**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६६/२०१५, नि.क्रं. ३७**<br>**गु.र.नं. १०४/२०१४ वेळापूर पोलीस ठाणे, ता.माळशिरस** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. अभियोक्ता | श्री. पी. एस. कश्यप. |
| आरोपी | उत्तम खंडू येडगे,<br>वय – ४५ वर्षे, धंदा – चालक,<br>रा. वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. एफ. के. कोरबू. |

## भाग – ब

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २२.११.२०१४ |
| पहिली खबर दिनांक | २४.१२.२०१४ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २६.०८.२०१५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७.०७.२०१७ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २२.११.२०१७ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०४.०८.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर. पी. सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उत्तम खंडू येडगे | १२.०२.२०१५ | १२.०२. २०१५ | भा.द.वि. कलम २७९,३०४ (अ),३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कलम १८४,१३४ /१७७ प्रमाणे | | | |

**भाग – क**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | संजय किसन साठे | पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | किरण शिवाजी चंदनशिवे | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | संजय पांडुरंग मंडले | साक्षीदार |
| अ.सा.क्र. ४ | सतिश दत्तू ठोंबरे | साक्षीदार |
| अ.सा.क्र.५ | दिलीप जयवंत तुपे | साक्षीदार |
| अ.सा.क्र.६ | संजयकुमार जगन्नाथ जाधव | खबरी |
| अ.सा.क्र. ७ | नामदेव दशरथ खांडेकर | तपास अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव /कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ११ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीपुरत्या भागाला |
| २ | ३३ | खबरी जबाब |
| ३ | ३४ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ३५ | जप्ती पंचनामा |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क.कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड.मुद्देमाल**

| अ.क्र | मुद्देमाल क्र | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**न्यायनिर्णय**

**(दिनांक ०४ ऑगस्ट, २०२६ रोजी घोषित)**

प्रस्तुत खटला आरोपीविरूध्द त्यांनी भारतीय दंड विधान, १८६० (या पुढे भा.दं.वि. म्हणून नमूद केलेले) चे कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/१७७ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केलेबाबत दाखल करणेत आला आहे.

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे:-**

(२) संजयकुमार जगन्नाथ जाधव (यानंतर थोडक्यात खबरी असे नमूद) दिनांक २३.१२.२०१४ रोजी गुजर हॉस्पीटल अकलूज येथे उपचारादरम्यान भर्ती असल्याने अकलूज पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदविला. त्यानुसार ते दिनांक २२.११.२०१४ रोजी त्यांचे वडील मयत जगन्नाथ यांच्यासह शेतातील कामे आटपून धोंडेवाडी वरून शंकरनगर अकलूज कडे त्याची मोटारसायकल सप्लेंडर एम. एच. ४५ २०६५ ने येत असताना खबरीचे वडील मयत जगन्नाथ मागे बसले होते. सायंकाळी ६.३० वाजताच्या सुमारास ते माने यांच्या

पेट्रोल पंपासमोर आले असता समोरून आरोपीची मोटारसायकल भरधाव वेगाने व चुकीच्या दिशेने येवून खबरीच्या मोटारसायकलला धडक दिली त्यामुळे खबरी व त्याचे वडील खाली पडले. त्यांना मार लागल्याने ते दोघेही बेशुध्द झाले. त्यानंतर त्यांना रूग्णवाहिकेत घालून अकलूज येथील गुजर हॉस्पीटल येथे आणले. खबरीच्या वडीलांना जास्त मार लागल्याने त्यांना अकलूज येथील क्रिटीकेअर हॉस्पीटलमध्ये पुढील उपचाराकरिता भर्ती केले. त्यांच्या मोटारसायकलला धडक देणारे वाहन आरोपीचे असल्याचे खबरीला समजले.

(३) खबरीच्या जबाबावरून आरोपीविरूध्द वेळापूर पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र. १०४/२०१४, भारतीय दंड संहिता कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/१७७ अन्वये दाखल करणेत आला. प्रस्तुत गुन्हयाचा तपास पोहेकॉ./११७१ एन. डी. खांडेकर, वेळापूर पोलीस स्टेशन यांनी केले. त्यांनी तपासकामी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. घटनेसंबंधीत साक्षीदारांकडे चौकशी करून, त्यांची तपास टिपणे नोंदविली. त्यांनी केलेल्या एकंदर तपासामध्ये आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने, तसेच सदर गुन्हयातील जखमी जगन्नाथ हा उपचारादरम्यान मयत झाल्याने भा.द.वि. कलम ३०४(अ) वाढीव कलम लावून आरोपीविरूध्द त्याप्रमाणे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

(४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी हजर झालेनंतर त्याचेविरूध्द

नि.क्र. ०८ येथे भा.दं.वि. कलम २७९, ३०४(अ), ४२७ व मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हयाचा तपशिल निश्चित करुन तो आरोपीस वाचून व समजावून सांगितले असता, त्याने तो नाकबूल करून खटला पुढे चालविणेची विनंती केली.

(५) आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आलेला असल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१) अन्वयेचे निवेदन (नि.क्र. ३६) नोंदविण्यात आले.

(६) दोन्ही पक्षांचे म्हणणे व पुरावा यावरून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपिस्थत झाले. त्यावरील निष्कर्ष पुढे दिलेल्या सविस्तर कारणांसाठी खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल क्र. एम. एच. ०८/क्यू ३०३४ ही मानवी जीवित धोक्यात येईल, अगर अन्य व्यक्तीला दुखापत अगर नुकसान पोहोचण्याचा संभव आहे, इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालविली, असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| **२.** | आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद मोटारसायकल हयगीयने अविचाराने व निष्काळजीपणाने चालवून समोरून येणारी हिरो | |

| | | |
|---|---|---|
| | होंडा स्प्लेंडर मोटारसायकलला धडक देवून मागे बसलेल्या जगन्नाथ बाळकृष्ण जाधव याच्या मृत्यूस कारणीभूत झाला, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय? | **नाही.** |
| ३. | आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद वाहन मानवी जीवित किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने चालवून दोन्ही वाहनांचे एकूण १०,०००/- रूपयांचे नुकसान करून आगळीक केली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय? | **नाही**. |
| ४. | आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद मोटारसायकल रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, धोकादायक रितीने चालविली, असे अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ५. | आरोपीस कोणत्या अपराधाबाबत सिध्ददोषी ठरविता येईल ? | **कोणत्याही नाही.** |
| ६. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ५ करिता** :

(७) ससदरील मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि अभियोगपक्षाने त्यावर

सादर केलेला पुरावा संयुक्त असल्याकारणाने, सदरील सर्व मुद्दे एकत्रितरित्या विवेचनासाठी घेतलेले आहेत. उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणात आलेल्या साक्षीपुराव्यांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्यात अभियोगपक्षाने असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटारसायकल हयगयीने, निष्काळजीपणे, बेदरकारपणे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून समोरून येणा-या हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल क्र. एम. एच. ४५/२०६५ समोरून धडक देवून संजय जाधव व जगन्नाथ जाधव यांना गंभीर जखमी करून जगन्नाथ जाधव यांच्या मृत्यू होणेस कारणीभूत ठरला.

(८) खबरीने (अ.सा.क्र. ६) नि.क्र. ३६ प्रमाणेसाक्ष दिली की, घटनेच्या वेळी तो व त्यांचे वडील मोटारसायकलने शेतातून घरी जात असताना वेळापूरच्या समोर असलेल्या पेट्रोल पंपापर्यंत आले असता समोरून एक दुचाकी भरधाव वेगात आली व त्यांच्या मोटारसायकलला समोरासमोर धडक दिली. त्यामुळे खबरी व त्याचे वडील रोडवर पडले व बेशुध्द झाले. त्यानंतर लोकांनी रूग्णवाहिका बोलावून त्यांना अकलूज येथील डॉ. गुजर यांच्या दवाखान्यात नेले. त्यांचे वडीलांना जास्त मार लागल्याने पुढील उपचाराकरिता डॉ. इनामदार यांच्या दवाखान्यात भर्ती केले. तेथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांना धडक देणारी मोटारसायकल आरोपी चालवित होता. ते गुजर हॉस्पीटलमध्ये उपचार घेत असताना पोलिसांनी त्यांचा जबाब (नि.क्र. ३३ प्रमाणे) नोंदविला.

(९) संजय (अ.सा.क्र. १) घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच असून त्याने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही.

(१०) किरण (अ.सा.क्र.२), संजय (अ.सा.क्र. ३), सतीश (अ.सा.क्र.४), दिलीप (अ.सा.क्र.५) घटनेचे साक्षीदार असून त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही.

(११) खांडेकर (अ.सा.क्र.७) तपासअधिकारी असून त्यांनी तपासादरम्यान घटनास्थळी जावून घटनास्थळ पंचनामा (नि.क्र. ३४ प्रमाणे) तयार केला. त्यानंतर अपघातातील मोटारसायकल (नि.क्र. ३५ प्रमाणे) जप्त करून दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले.

(१२) वरील साक्षीदारांच्या पुराव्यावरून असे स्पष्ट होते की, आरोपीविरूध्द लावलेले आरोप सिध्द करण्याकरिता अभियोग पक्ष खबरी (अ.सा.क्र.६) च्या साक्षीवर विसंबून आहे. खबरीने त्याच्या साक्षीमध्ये सांगितले की, घटनेच्या वेळी समोरून एक दुचाकी भरधाव वेगात आली व त्यांच्या दुचाकीला धडक दिली. परंतु धडक देणारी दुचाकी आरोपी चालवित होता याबाबतचा स्पष्ट पुरावा अभिलेखावर नाही.

(१३) खांडेकर (अ.सा.क्र.७) यांनी तपासादरम्यान अपघातातील मोटारसायकल जप्ती पंचनामा (नि.क्र. ३५ प्रमाणे) जप्त केल्याचे सांगितले. परंतु त्याच मोटारसायकलने

अपघात झाला व ती मोटारसायकल आरोपीच्या नावे आहे तसेच घटनेच्या वेळी ती मोटारसायकल आरोपीच चालवित होता याबाबतचा ठोस पुरावा अभिलेखावर नाही.

(१४) शिवाय, अपघातातील मोटारसायकल आरोपी घटनेच्या वेळी हलगर्जीपणाने व निष्काळजीपणाने चालवित होता व त्याच्या चुकीमुळे अपघात घडला याबाबतचा सुध्दा स्पष्ट, ठोस व सातत्यपूर्ण पुरावा अभिलेखावर आलेला नाही. यावरून घटनेच्या वेळी खबरी व त्याचे वडील मयत जगन्नाथ ज्या मोटारसायकलवरून जात होते त्या मोटारसायकलचा अपघात होवून ते दोघेही जखमी झाले व उपचारादरम्यान खबरीचे वडीलांचा मृत्यू झाला हया बाबी जरी सिध्द होत असल्या तरी सदर घटनेसोबत आरोपीचा असलेला संबंध जोडण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द लावलेले आरोप शंकापलीकडे सिध्द होत नाही. म्हणून मी मुद्दे क्रमांक १ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. ६ करिता:–</u>**

(१५) मुद्दे क्र. १ ते ५ च्या नकारार्थी निष्कर्षाने हे स्पष्ट होते की, आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द झाला नाही म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.६ करिता खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) आरोपी उत्तम खंडू येडगे याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) (भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २६५(१)) नुसार भारतीय दंड विधान कलम २७९, ३०४(अ), ४२७ व मोटर वाहन कायदा कलम १८४ अन्वयेच्या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणेत येते.

२) आरोपीचे वैयक्तीक जात मुचलके व जामीनकीचे बंधपत्रे रद्द करणेत येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७अ ( भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ ) नुसार १५,०००/– रुपयांचा जातमुचलका व जामीन कदबा देण्याबाबत आरोपीस निर्देशित करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला.)

Digitally signed by UMESH PETHE
Date: 2026.08.04 17:49:16 +0530

स्थळ : माळशिरस
दिनांक : ०४/०८/२०२६

**(यु. बी. पेठे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, माळशिरस,
ता. माळशिरस, जि.सोलापूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | M. P.Gheradi. |
| (b) | Name of the Court | : | Jt. C.J.J.D & J.M.F.C<br>Malshiras, Dist - Solapur |
| (c) | Order signed by P.O. On | : | 04.08.2026 |
| (d) | Order uploaded on | : | 04.08.2026 |